# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

Approved by : University Grant Commission (UGC)

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS

Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २४) | महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका : एक अभ्यास | डॉ.तळेकर चंद्रशेखर |
| २५) | महाराष्ट्राच्या राजकाराणातील बदलते नेतृत्व | डॉ. सुनिल पिंपळे |
| २६) | महाराष्ट्रातील मानवी स्थलांतर आणि विकासाचा प्रश्न | प्रा. डॉ.मोहन चौगुले |
| २७) | महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलती समीकरणे | डॉ. रामकिशन लोमटे |
| २८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : मा. शरद पवार | डॉ. बाळ कांबळे, प्रा. प्रदीप जगताप |
| २९) | महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास : वास्तवता | डॉ. संजय भोळे, डॉ. के. जी. पोकळे |
| ३०) | भाषावार प्रांतरचना आणि महाराष्ट्र : संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विशेष संदर्भ | स्वप्निल बोधने |
| ३१) | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृतीचे बदलते स्वरूप | डॉ. राजकुमार सुरवसे |
| ३२) | महाराष्ट्राच्या राजकारणातील समस्या | प्रा. जे. जी. गायकवाड |
| ३३) | महाराष्ट्राचे राजकारण आणि जात | डॉ संभाजी वारूंगळे पाटील |
| ३४) | महाराष्ट्राचे राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते बहुपक्षीय स्पर्धा | प्रा. ऋतुराज बुवा |
| ३५) | महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष व जातींचा राजकारणातील प्रभाव | प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर |
| ३६) | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाचा राजकीय व्यवहार | प्रा. किर्तीकर भीमराव |
| ३७) | महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील बदलते नेतृत्व | शेख जब्बार खलील |
| ३८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण | प्रा. कांतीलाल सोनवणे |
| ३९) | महाराष्ट्रातील स्थानिक राजकीय प्रक्रिया | डॉ. संतोष कायंदे |
| ४०) | आधुनिक महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राच्या विकासात यशवंतराव चव्हाणांची भूमिका | डॉ. कलिदास फड |
| ४१) | महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी घटक | प्रा.जयश्री शेंडे |
| ४२) | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ | डॉ. आर.के. काळे |
| ४३) | शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे स्त्री-स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ |
| ४४) | महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : एक अवलोकन | प्रा. किरण गायकवाड |
| ४५) | रोहिंग्या मुस्लिमांचा प्रश्न आणि भारताची भूमिका | दत्तात्रय जाधव |
| ४६) | मराठा आरक्षण | डॉ. मंजिरी कारेकर |
| ४७) | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ | डॉ. हनुमंत फाटक, प्रा.अविनाश सावळकर |
| ४८) | महाराष्ट्रातील विडी कामगार चळवळी समोरील पेचप्रसंग | प्रा. राजू पांडे |
| ४९) | महिलांच्या समस्या आणि वाद | डॉ. दिनकर कळंबे |
| ५०) | महिलांचे मानवी हक्क : एक ऋजुतापूर्वक न्याय | डॉ. सुवर्णा गुडगे-बेनके |
| ५१) | भारतीय राजकारणात स्त्रीयांची भूमिका व योगदान विशेष संदर्भ :- महाराष्ट्र राज्य | डॉ.कदम हरिभाऊ |
| ५२) | पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग | डॉ. विलास आघाव |
| ५३) | मंदिर प्रवेश - स्त्री हक्क | प्रा.डॉ.मनिषा कचवे |
| ५४) | महिला सबलीकरणात महाराट्राची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप |
| ५५) | मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व | डॉ. संजय लांडगे |

Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

42

# महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ

डॉ. आर.के. काळे
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड.
urkale.kale@gmail.com

**प्रस्तावना :**

**पुरोगामी महाराष्ट्राला या पुरोगामीत्वापर्यंत आणण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक समाजिक, राजकीय चळवळीचा हातभार लागलेला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत दलीत चळवळ, सहकार चळवळ, शेतकरी चळवळ, महिलांची चळवळ अशा अनेक चळवळींनी महाराष्ट्राचा राजकारण पुर्वापार पासून ढवळुन निघालेले आहे. अनेक चळवळींचा वारसा महाराष्ट्राला लाभलेला आहे. त्यापैकी एक चळवळ म्हणजे आदिवासी समुदायाची चळवळ. महाराष्ट्राच्या राजकारणाला व समाजव्यवस्थेला एक वेगळे वळण लावणारी चळवळ म्हणून तीचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. आदिवासी हा मानववंशशास्त्र दृष्टया हा भारतीय लोकसमाजाचा प्राचीनतम विभाग आहे. वन आणि पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना आदिवासी असे म्हणतात. आदिवासी समाज ही भारतीय जनजीवनापासून प्रादेशिक आणि सांस्कृतिकदृष्टया अलिप्त आहे.**

भारतातील जवळजवळ सर्व राज्यात आदिवासी जमाती आढळतात. डोंगरकपाऱ्यात वास्तव्य करणाऱ्या, आपल्या रूढी परंपरा जपणाऱ्या आणि स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या आदिवासींना कोणी जंगलाचे राजे, तर कोणी वनवासी, काही लोक आदिम समाज असे म्हणतात. सिसले, ग्रीनसन, लॅक्सी, एल्विन, सेडविक, मार्टिन व ठक्कर बाप्पा इत्यादी आदिवासीच्या अभ्यासकांनी त्यांना मूळचे रहिवाशी म्हटले आहे. डॉ. गो.स.घुर्ये यांनी मासगलेले हिंदू म्हणतात. त्याशिवाय गिरिजन, वनवासी, वन्यजाती, भूमिपुत्र असे म्हणतात. घटनेच्या कलम ३४१, ३६६ आणि ३४२ नुसार आदिवासीचा अनुसूचित जमाती असा उल्लेख आहे. २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासीची लोकसंख्या ८ कोटी ४३ लक्ष इतकी होती. भारताच्या एकूण लोकसंख्येत आदिवासीचे प्रमाण ८.२० टक्के इतकी आहे. भारतात आदिवासी जमातीची संख्या ५५० इतकी आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीचा थोडक्यात उहापोह केलेला आहे.

**महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी :**

ब्रिटिश काळापासून आदिवासी जमातीमध्ये चळवळी उभारलेल्या दिसतात. ब्रिटिश काळात मध्य भारतातील मुंडा, खाखार या जमातीनी चळवळी केलेल्या दिसतात. महाराष्ट्रात देखील भिल्ल समाजातील लोकांनी ब्रिटिश राजवटीला विरोध करण्यासाठी चळवळी केलेल्या दिसतात. परंतु या चळवळी ब्रिटिशांनी दंडशक्तीची वापर करून दडपून टाकलेल्या दिसतात. स्वातंत्रोत्तर काळात आदिवासी जमातींना घटनात्मकदृष्टया समान दर्जा देण्यात आला. आदिवासीच्या विकासासाठी अनेक घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये जागृती निर्माण झाल्यामुळे हळूहळू या समाजातील लोक संघटित होऊ लागले. १९६० च्या दशकात कम्युनिस्ट पक्षाने 'अखिल भारतीय अनुसूचित जमाती' ची संघटना बांधण्याच्या कार्यात पुढाकार घेतला. कारण या समुदायात शिक्षणाचे नगण्य प्रमाण, अगलत्वाची भावना असल्याने त्यांच्या मुक्तीसाठी चळवळीत गती देणे व संघटना बांधणे अत्यंत अवघड काम होते. तरीही काही राजकीय पक्ष, समाज सुधारक आणि स्वयंसेवी संस्थानी आदिवासींना संघटित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. बिहार व झारखंड राज्यात शिबू सोरेन, विनोद बिहारी मोहातो यांनी झारखंड मुक्ती मोर्चा अंतर्गत 'आक्रमकता चळवळ' केली. आसाममध्ये 'बोडो' जमातीच्या लोकांनी जमातीची भाशा, तिचे अस्तित्व, स्वायत्ततेसाठी आंदोलन चालविले. महाराष्ट्रात देखील धुळे, नंदुरबार, अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यामध्ये कर्जमुक्ती, मजुरी वाढ, जमीन परत मिळावी, वन जमिनीचे हक्क इत्यादी मागण्यासाठी आंदोलने केलेली आहेत.

समकालीन राजकारणातील मेधाताई पाटकर, प्रतिभा शिंदे, राजेंद्र गावीत, के.सी. पाडवी, विजयकुमार गावीत, माणिकराव गावीत, शरद गावीत, कॉ. शरद पाटील, नजुबाई गावीत यांनी आदिवासी जमातींना संघटीत करून त्यांचे प्रश्नसोडविण्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे, धेराव इत्यादीच्या माध्यमातून त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला दिसतो. आदिवासीसाठी विविध चळवळी झालेल्या असलया तरी त्यांचे प्रश्न अजूनही सुटलेले नाही. २००६ मध्ये वन हक्क



Scanned with CamScanner